दैनिक **आपला विदर्भ**

रविवार १०.०८.२०२५

मुख्य संपादक - देविदास खनपटे मो. 9767233034

बुलडाणा

बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, अमरावती, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, छत्रपती संभाजीनगर, मुंबई

वर्ष - ४ था ● अंक - २० ● पान - ४ ● RNI.No.MAHMAR2023/88006

apalavidarbhlivenews@gmail.com

किंमत - २.००


**मैदानाबाहेरही 'प्रिन्स'ची हवा!**
**शुबमन गिलच्या जर्सीवर लागली सर्वात मोठी बोली**



# आदिवासींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही : एकनाथ शिंदे

● दै. आपला विदर्भ

अकोले : आदिवासी समाजाच्या प्रश्नासंदर्भात सरकार सकारात्मक आहे. पर्यावरण रक्षणाचे जल, जंगल, जमीन संरक्षणाचे काम आदिवासी समाजानेच केले आहे, असे सांगतानाच आदिवासी समाजाच्या ताटातले काढून दुसऱ्याला देण्याचे काम सरकार कधीही करणार नाही, असे सांगत आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेनेच्या (शिंदे गट) वतीने जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. मेळाव्याचे अध्यक्षस्थानी शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त डॉ. जालिंदर भोर होते.



आमदार अमोल खताळ व आमदार विठ्ठलराव लंघे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. पदे येतात, जातात, पुन्हा येतात पण 'लाडका भाऊ' म्हणून मला जी ओळख मिळाली ते सर्वांत मोठे पद आहे, असे सांगून एकनाथ शिंदे म्हणाले, कोणी कितीही अफवा पसरवल्या तरी लाडकी बहीण योजना कदापिही बंद होणार नाही. महायुतीचे हे सरकार शब्द पाळणा मारुती मेंगाळ यांनी आदिवासींच्या प्रश्नांचा आढावा घेतला. बाळासाहेब भोर यांनी स्वागत केले. शर्मिला येवले यांनी आभार मानले. रे सरकार आहे. त्यामुळे दिलेली सर्व आश्वासने टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील.

### उपमुख्यमंत्र्यांना महिलांनी राख्या बांधल्या

- रक्षाबंधनामुळे महिलांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना राख्या बांधल्या. लव्हाळवाडी येथील महिलांनी पारंपरिक आदिवासी महिला नृत्य सादर केले. शिंदे यांनी व्यासपीठावरून खाली येत या कलाकारांचा सत्कार केला. या वेळी अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले.

### भांगरे व ठाकर स्मारकासाठी निधी देऊ

- अकोले तालुक्यासाठी २ हजार कोटी रुपये देणारा मी मुख्यमंत्री असल्याचा उल्लेख उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केला. आदिवासी समाजाला सशक्त करण्याचा विडा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उचलला आहे. समाजासाठी विविध योजना सुरू केल्या. राष्ट्रपतीसारखे सर्वोच्च पद दिले. बिरसा मुंडा यांचा जन्मदिवस जनजाती गौरव दिन म्हणून सुरू केला. आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे व राया ठाकर यांच्या स्मारकांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.





## जागतिक आदिवासी दिनानिमित्त कल्याणात भव्य शोभायात्रा

● दै. आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : आदिवासी संस्कृती आणि त्यांच्या अस्तित्वाची ओळख जगाला व्हावी आणि एकजुटीचे प्रदर्शन व्हावे यासाठी ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिवसाचे औचित्त साधून कल्याण मध्ये भव्य शुभयात्रा काढण्यात आली, या रॅलीत आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारे पेहराव परिधान करून नागरिक सहभागी झाले होते, विशेष म्हणजे या रॅलीत सुशिक्षित तरुणाईचा मोठ्या प्रमाणात सहभाग असल्याचे दिसून आले. जागतिक आदिवासी दिवसानिमित्त कल्याणात भव्य रॅली काढण्यात आली, आदिवासी क्रांतीकारांना आदरांजली वाहून रॅलीची सुरवात कल्याण पश्चिमेतील सुभाष मैदान येथून सुरुवात करीत छत्रपती शिवाजी महाराज चौक, पत्रीपूल, नेते नाका, चक्की नाका, विजयनगर येथे समारोप झाला, रॅलीमध्ये आदिवासींची संस्कृती, आदिवासी नृत्य, आदिवासी गीते, पोवाडे, विविध वाद्य, वेशभूषा, पारंपारिक लोकनृत्याच्या माध्यमातून आदिवासी कलागुण पाहायला मिळाले, तसेच आदिवासी क्रांतिकारकांचे देखावे सादर करण्यात आले, या रॅलीत संयुक्त आदिवासी उत्सव समिति कल्याणचे अध्यक्ष प्रभुदास पंधरे, यांच्या नेतृत्वाखाली या शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते, रामनाथ भोजने, भागजी भांगरे, भरत बुळे, भरतकुमार पाटील, सविता हिले, जयराम शिंदे, संजय ओंकारेश्वर, दिलीप वरकडे आदींसह कल्याण डोंबिवली महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी वृंद यांच्यासह हजारोंच्या संख्येने सर्व आदिवासी बांधव सहभागी झाले.

## नवनीत राणा यांनी त्यांच्या अंगरक्षाका सोबत साजरी केली रक्षाबंधन



● दै. आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : भाजपाच्या नेत्या अमरावती जिल्ह्याच्या माजी खासदार नवनीत राणा यांना केंद्र सरकारची वाय प्लस केंद्रीय सुरक्षा दलाची सुरक्षा आहे, बंदूकधारी पोलीस नवनीत राणा यांच्या सुरक्षेसाठी तैनात असतात, मात्र आज रक्षाबंधन असल्याने त्यांच्या सुरक्षारक्षकांना रक्षाबंधन साठी आपल्या गावी जाता आलं नाही, पण नवनीत राणा यांनी त्यांच्या निवासस्थानी सर्व जवानांना राख्या बांधून त्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. दरवर्षी नवनीत राणा आपल्या सुरक्षारक्षकांसोबत रक्षाबंधन साजरी करत असतात.

## नवनीत राणांना धमकी देणाऱ्याला अटक




दै. आपला विदर्भ

**अमरावती** : शेख इचा शेख मुसा वय २८ रा.पथ्रोड अंजनगाव सुर्जी यांनी माजी खासदार नवनीत राणा यांना इंस्टाग्राम व्हिडीओ द्वारे शिवीगाळ करण्यात आली होती. त्या नंतर राजापेठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून तपास सुरु करण्यात आला. गुन्हे शाखा युनिट दोन ने २४ तासाचा आता आरोपीला अटक केली आहे.

आरोपीला पळून लावण्यास मदत करणाऱ्यांना सुद्धा अटक केली आहे. एकूण पाच आरोपीला युनिट दोनच्या पथकाने अटक भिलाई छत्तीसगड येथून ताब्यात घेतले आहे.अशी माहिती पोलीस उपआयुक्त शाम घुगे यांनी पत्रकार परिषदमध्ये दिली आहे.





## सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पा विरोधात शेतकरी आक्रमक

● दै. आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाला आता शेतकऱ्यांचा तीव्र विरोध होताना दिसत आहे. शासनाने नांदेडच्या किनवट तालुक्यातील पैनगंगा नदीवर या जलविद्युत प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. शासनाने मंजुरी दिल्याने शेतकरी आता आक्रमक झाले आहेत. नांदेड जिल्हा तसेच विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील जवळपास 35 ते 40 गावातील सुपीक जमीन या प्रकल्पामध्ये जाणार आहे. त्यामुळे शेतकरी आता या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी एकवटले आहेत. आज नांदेडच्या हिमायतनगर तालुक्यातील सिरपल्ली येथे शेतकऱ्यांनी एल्गार महासभा घेऊन तीव्र विरोध दर्शविला आहे. 'जान देंगे पर जमीन नही देंगे' अशी भूमिका या शेतकऱ्यांनी घेतली आहे.

## 'लाडकी बहीण योजना बंद होणार नाही' – मंत्री जयकुमार रावल

● दै. आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : "महिलांसाठी राबविलेली लाडकी बहीण योजना ही केवळ योजना नसून, राज्यातील बहिणींच्या सक्षमीकरणाचा संकल्प आहे. ही योजना कधीच बंद होणार नाही," असे प्रतिपादन पणन व राजशिष्टाचार मंत्री ना. जयकुमार रावल यांनी रक्षाबंधन कार्यक्रमात केले.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने आज शिंदखेडा मतदारसंघातील महिला सरपंच व विविध संस्थांच्या महिला पदाधिकाऱ्यांनी मंत्री रावल यांना राखी बांधून सण साजरा केला. यावेळी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी देखील विशेष राख्या पाठविण्यात आल्या. मंत्री रावल यांनी महिलांसाठी लवकरच हेल्थ चेक-अप कॅम्प आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच महिला लोकप्रतिनिधींना देवदर्शनासाठी विविध तीर्थक्षेत्रांना भेटी देण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल, असेही त्यांनी जाहीर केले. या कार्यक्रमाला संजिवनी सीसोदे, चंद्रकला सिसोदिया, स्नेहा आयाचित, क्रांती पाटील रहिमपुरे, कविता पाटील सवाईमुकटी ,प्रियंका बडगुजर, रजनी वानखेडे शिंदखेडा, शैलजाताई पाटील ,माजी सभापती, छाया गिरासे माजी सभापती, अर्चना पाटील अंजन अहिरे, स्वाती बागल, रोहिणी लिंबारे, लता कोठावदे (अध्यक्ष), संगीता देशमुख, सिमा दिनेश ठाकरे, माधुरी विष्णू पाटील यांच्यासह विविध गावांतील महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या.



## संक्षिप्त



### 9 ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त भव्य जल्लोष रॅली

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**अमरावती :** 9 ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त अमरावती शहरात शनिवारी मोठ्या जल्लोषात रॅलीचे आयोजन करण्यात आले. नेहरू मैदान राजकमल चौक ते इर्विन चौक येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. महापुरुषांच्या नामाचे समरण करून घोषणा देत शेकडो हजारो आदिवासी बांधवानी आपला जल्लोष व्यक्त केला. शोभा यात्रेत आदिवासी बांधवांच्या पारंपारिक वेशभुषेत अनेकांनी सहभाग घेतला. तर पारंपारिक वेशभूशेत नृत्य सादर केले. भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांचे फलक हाती घेत रॅलीत जल्लोष व्यक्त करण्यात आला. आदिवासी कृती समितीच्या वतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. जल्लोष रॅलीत अमरावती जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून तरुणाई सहभागी झाली होती. मात्र याच दिवशी आदिवासी विभागाने सहभाग न घेतल्याने तसेच शासनाच्या वतीने थेट नागपुरात कार्यक्रम आयोजित केल्याने आदिवासी बांधवानी आदिवासी विभागाचा निषेध व्यक्त केला.



### सामाजिक सेवा संस्था वतीने कारागृहात रक्षाबंधन उत्सव साजरा, बंदींना राखी बांधून अनेक महिलांनी घेतला आशीर्वाद

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**अमरावती :** बहिण भावांचा अतुट नातं असलेला रक्षाबंधन हा उत्सव देशभरात मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. अमरावती शहरात सुद्धा अनेक सामाजिक सेवा संस्थांच्या वतीने ठिकठिकाणी रक्षाबंधन हा सण साजरा करण्यात आला..दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा अमरावती मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंदींना राखी बांधून त्यांचा समाजसेवी संस्थेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी आशीर्वाद घेतला. वृंदा मुक्तेवार बरखा बोज्जे सह अनेक महिलांनी कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंदींना ओवाळून राखी बांधून त्यांच्या समवेत रक्षाबंधनाचा सण साजरा केला. यावेळी कारागृह प्रवेशद्वार जवळ कारागृह अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांच्यासह पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना सुद्धा राखी बांधून रक्षाबंधनाचा उत्सव साजरा करण्यात आला. इतर सेवाभावी संस्थांच्या वतीने सुद्धा बंदिना राखी बांधून रक्षाबंधनाचा उत्सव साजरा केला. यावेळी रक्षाबंधन उत्सव निमित्त कारागृह अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांच्यासोबत सामाजिक संस्था पदाधिकाऱ्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.




### विरोधकांनी कितीही अफवा पसरवू द्या तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही- एकनाथ शिंदे

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**अहिल्यानगर :** लाडकी बहीण योजनेला विरोधकांनी चुनावी जुमला म्हटलं होत. आता विरोधकांनी कितीही अफवा पसरवू द्या तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही अस ठाम आश्वासन एकनाथ शिंदे यांनी रक्षाबंधनाच्या निमित्तान अकोले अदिवासी कार्यक्रमात दिलय. शेतकरी कर्जमाफी देखील आम्ही म्हणालो होतो हे शब्द देणार सरकार आहे..शब्द पाळणार सरकार आहे.. जे जे काही आम्ही बोललो आहे ते टप्प्या टप्प्याने केल्या शिवाय राहणार नाही.आम्ही प्रिंटिंग मिस्टेक म्हणणार नाही अस सांगत विरोधकांवर निशाना साधलाय.

### सोलापुरात साकारण्यात आली महर्षी मार्कंडेय महामुनींची महाप्रतिमा

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**सोलापूर :** पद्मशाली समाजाचे कुलदैवत महर्षी मार्कंडेय महामुनी यांच्या रथोत्सवाचे औचित्य साधून 160 X 260 फूट आकारातील (एक एकर) मोजॅक आर्ट पद्धतीचे चित्र पद्मशाली युवजन संगमच्या वतीने सोलापुरातील कुचन हायस्कूल मैदानात साकारण्यात आले आहे. पाऊस पडला तरी रंग जाऊ नये, म्हणून यासाठी प्लास्टिक पेंटचा वापर करण्यात आला आहे. चित्रकार विपुल मिरजकर आणि त्याच्या टीमला ही कलाकृती सकरण्यासाठी 22 दिवसांचा कालावधी लागला.

## अग्रलेख

# खातेबदलाचे 'पत्ते'

एकापाठोपाठ एक अशा असंवेदनशील वक्तव्यांची मालिका आणि भर सभागृहातील पत्त्यांचा खेळ यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या खुर्चीवर आलेले गंडांतर खातेबदलावर निभावले आहे. कृषी खात्यातून त्यांची रवानगी क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ या खात्यांमध्ये करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुनावलेले खडे बोल आणि अजित पवार यांनी घेतलेली त्यांची हजेरी या पार्श्वभूमीवर झालेल्या या खातेबदलास 'कारवाई' म्हणावे का, असा प्रश्न पडतो. नाशिकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा गड लढविणारे अजित पवार यांचे लढाऊ शिलेदार असलेले कोकाटे कृषी खाते मिळाल्यापासूनच वारंवार वाद ओढवून घेत होते. 'ढेकळांचे पंचनामे करायचे का', 'सरकार भिकारी' अशा त्यांची वक्तव्ये प्रसिद्धीझोतात आल्यापासून त्यांच्या नेत्यांच्याही डोळ्यांपुढे तारे चमकू लागले होते. विधिमंडळाच्या सभागृहात पत्ते खेळत असतानाची त्यांची चित्रफीत झळकली आणि विरोधकांना आयता मुद्दा मिळाला. इथवरचे विषय कदाचित रेटून गेले असते; पण त्याविरोधात आंदोलन करणाऱ्या 'छावा' संघटनेच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केलेली मारहाण, ही उंटाच्या पाठीवरची शेवटची काडी ठरली. हे प्रकरण आपल्यावर आणि पक्षावर शेकण्याची शक्यता दिसताच नेतृत्वाचे बैठकांचे सत्र सुरू झाले. खुद्द फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावरून हजेरी घेतली; तसेच अजित पवार यांनीही कानउघाडणी केली. अखेरीस या 'समज' आणि 'खडसावणी'च्या डोंगरातून खातेबदलाच्या कारवाईचे पिल्लू बाहेर पडले आहे. आईचा मार लेकराला लागत नाही, असे म्हणतात, त्याप्रमाणेच आपल्या नेत्यांकडून झालेली ही कारवाई पाहून कोकाटे यांनाही 'गुलाबाचे काटे, तसे आईचे धपाटे'चे प्रत्यंतर आले असेल. राज्यात तीन वेगवेगळ्या विचारसणीच्या पक्षांच्या महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून काही मंत्री आणि आमदारांवर आरोपांच्या फैरी झडत आहेत. मागचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची बीडमधील हत्या प्रकरण आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे गच्छन्ति झाली. त्यानंतर संजय शिरसाट यांची नोटांनी भरलेल्या बॅगेसह चित्रफीत प्रसिद्ध झाली; तर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावे डान्स बारचा परवाना असल्याचे उघडकीस आले. भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांनी विधान भवनात 'फ्री स्टाइल' मारामारीची; तर शंभुराज देसाई यांनी सभागृहातच विरोधी आमदारांना 'दबंग'पणाची झलक दाखवली. मंत्री आणि आमदारांच्या अशा कोणत्याही 'क्रीडा' अंगाला लावून न घेण्याचे कौशल्य नेतृत्वाने साधल्याचे दिसते. कोणावरही आरोप झाले, तरी राजीनाम्याच्या मागणीला भीक घालायची नाही, हा बाणा अपवाद वगळता भारतीय जनता पक्षाने पूर्वीपासून जपला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तर योगेश कदम यांच्या पाठीशीही उभे राहिले; पण अजित पवार 'संवेदनशील' असल्याने त्यांनी होता होई तो कठोर भूमिका घेऊन कोकाटे यांना खातेबदलाची 'कडक' शिक्षा केली. अडचणीची शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसारखी संकटे उभी असताना कोकाटे यांचे वर्तन असंवेदनशील आणि नैतिकदृष्ट्या अयोग्यच होते; पण नोटांची पुडकी सापडणे किंवा बंदी असताना डान्स बारवर पोलिसांचे छापे, हे प्रकार किमान 'चौकशीपात्र' तरी आहेत की नाही, याचे उत्तर देण्याचीही तसदी कुणी घेतलेली दिसत नाही. कोकाटे यांच्या निमित्ताने फडणवीस-पवार यांनी खातेबदलाचे 'पत्ते' पिसले; पण मूळ प्रश्न त्यापलीकडचे आहेत. 'आमदार माजलेत' किंवा 'पुन्हा खपवून घेणार नाही' या फडणवीस यांच्या कृतिविरहित उद्विग्नतेतून त्यांचे हात बांधले असल्याचा संदेश जातो, हे लक्षात घेतले पाहिजे. आरोप झालेल्यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या शिंदे यांना दुखावण्याची त्यांची तयारी दिसत नाही. कदाचित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, किंवा शिंदे यांना लाभलेले 'महाशक्ती'चे आशीर्वाद अशी काही कारणे त्यामागे असावीत; किंवा सरकारला लाभलेले प्रचंड बहुमत आणि दुर्बळ विरोधक पाहता अशा आरोपांमधून बदनामीच्या व्यतिरिक्त आणखी काही शिक्षा होत नाही, हा विश्वासही असावा. मात्र, अशा घटनांचे ओरखडे संपूर्ण सरकार आणि पक्षाच्याही प्रतिमेवर पडतात, याची जाणीव ठेवली पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे, क्रीडा, युवककल्याण आणि अल्पसंख्याक या खात्यांकडे 'शिक्षा' म्हणून पाहिले जात असेल, तर सरकारच्या या 'दृष्टी'ला दाद देण्याशिवाय जनतेच्या हाती काय राहते?

# हवाई सुरक्षा तोफखाना





**पार्श्वभूमी :** पहिल्या महायुद्धानंतर लष्करी विमाने मोठ्या प्रमाणावर विकसित झाली. ही विमाने टेहळणीसाठी, शत्रूच्या शहरांवर, सैन्यावर आणि सैन्याच्या शस्त्र आणि पुरवठा यंत्रणांवर तसेच संपर्क प्रणालींवर हवाई हल्ले चढविण्यासाठी वापरण्यात येऊ लागली. दुसऱ्या महायुद्धादरम्यान विमाने शत्रूच्या आरमारावर हल्ला करण्यासाठीसुद्धा वापरण्यात येऊ लागली. मोठ्या विमानवाहू नौकांवरून विमानांची वाहतुक सुरू झाली. विमानांतून मशिनगनचा मारा, बाँबफेक, रॉकेटचा मारा इत्यादी होऊ लागले. काही काळानंतर सैन्याच्या वाहतुकीसाठी, पुरवठा यंत्रणेसाठी विमानांचा वापर होऊ लागला. त्यानंतर हेलिकॉप्टरचे आगमन झाले.

जसजशी हवाई ताकत वाढू लागली आणि जसजशी विमानांची क्षमता आणि हवाई हल्ला करण्याच्या पद्धतीत विविधता येऊ लागली, तसतशी जमिनीवरून मारा करून शत्रूची विमाने पाडण्यासाठी शस्त्रास्त्रे विकसित करण्याची आवश्यकता निर्माण झाली. या गरजेतून हवाई सुरक्षा तोफखान्याचा जन्म झाला. अशाप्रकारे शत्रूच्या विमानांना मज्जाव करून त्यांचा विध्वंस करण्याचे मुख्यतः वायुसेनेचे, तर आघाडीवरील रणांगणावर लष्कराच्या हालचालींना शत्रूच्या विमानांपासून निकट संरक्षण देण्याचे काम हवाई सुरक्षा गटाचे असते. युद्धक्षेत्रात ज्या ठिकाणी आपल्या रणगाड्यांचा, तोफांचा, सैनिकांचा किंवा इतर महत्त्वाच्या सैनिकी साहित्यांचा ताफा मोठ्या प्रमाणात तैनात असेल, तेथे त्यांना शत्रूच्या विमानांच्या हल्ल्यापासून संरक्षण देण्यासाठी हवाई सुरक्षा तोफखान्याच्या विमानभेदी तोफा तैनात केल्या जातात. विमानविरोधी शास्त्रास्त्रांचा विकास आजतागायत सुरूच आहे. विमानांची क्षमता, त्यांच्या हल्ला करण्याच्या पद्धती, क्षेपणास्त्रांचा वाढलेला आवाका आणि त्यातून निर्माण होणारे हवाई सुरक्षेसंबंधीचे धोके, हे सर्व लक्षात घेऊन हवाई सुरक्षेसाठी वापरात येणाऱ्या शस्त्रास्त्रांमध्ये लक्षणीय विकास झाला आहे.

**पहिले महायुद्ध ते १९६० पर्यंतच्या अवधीतील विकास :** पहिल्या महायुद्धाच्या वेळी अमेरिकेने सर्वप्रथम हवाई सुरक्षा तोफखान्याची तुकडी उभी केली. त्यानंतर फ्रान्स आणि इंग्लंड यांनी सुद्धा अशा तुकड्या उभ्या केल्या. परंतु प्रत्यक्षात अशा सैनिकी तुकड्यांची प्रगती दुसऱ्या महायुद्धादरम्यान झाली. सुरुवातीला जमिनीवर मारा करणाऱ्या मशीनगन्स कमी उंचीवरून हल्ला करणाऱ्या शत्रूच्या विमानांविरोधात वापरल्या जाऊ लागल्या. पण विमानांची हल्ला करण्याची उंची वाढू लागल्यावर या मशीनगन्स निरुपयोगी ठरू लागल्या. म्हणून जास्त लांब पल्ल्याच्या आणि जास्त व्यासाच्या तोफांची निर्मिती झाली. सुरुवातीला या तोफा हवाईपट्टी आणि महत्त्वाची सामरिक ठिकाणे यांच्या सुरक्षिततेसाठी तैनात केली जात असत. पण नंतरनंतर पुढे आक्रमक हालचाली करणाऱ्या किंवा संरक्षणात्मक पवित्रा घेतलेल्या सैन्याला शत्रूच्या हवाई हल्ल्यापासून संरक्षण देण्यासाठी अशा तोफा वापरण्यात येऊ लागल्या. वायुदलात अतिवेगाने जाणाऱ्या विमानांचा अंतर्भाव होऊ लागल्यानंतर लक्ष्यावरील अचूक माऱ्याच्या शक्यतेचे प्रमाण वाढविण्यासाठी तोफांच्या भडिमाराचा वेग वाढविण्यात आला. तसेच एका तोफ प्रणालीमध्ये जास्त नळकांड्या बसविण्यात आल्या. त्याला 'मल्टी बॅरल गन' म्हणतात. पुढे आक्रमक हालचाली करणाऱ्या रणगाडा दलावरील हवाई हल्ल्याचा प्रतिकार करणाऱ्या तोफा स्वयंचलित चिलखती गाड्यांवर बसविण्यात आल्या. या सर्व तोफांना रडारच्या साहाय्याने विमानविरोधी निर्देशन करण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले. त्याचबरोबर पायदळातील जवानांसाठी हवाई हल्ल्याविरोधात मारा करू शकणारी क्षेपणास्त्रे सुद्धा वापरात येऊ लागली. अशी क्षेपणास्त्रे १९७३च्या अरब-इझ्राएली युद्धात इजिप्तच्या सैन्याने इझ्राएलच्या वायुसेनेवर प्रभावी रीत्या वापरली होती.

**१९७० नंतर हवाई हल्ल्याविरोधातील तोफखान्याची प्रगती :** जसजशी वायुदलाच्या विमानांच्या तंत्रज्ञानात प्रगती होत गेली, तसतशी विमानांची मारा करण्याची क्षमता वाढत गेली आणि युद्धतंत्रात बदल होत गेला. मारा करण्यासाठी शत्रूच्या माऱ्याच्या पल्ल्याबाहेर राहून हल्ला करण्याची पद्धत रूढ होत चालली. मार्गदर्शक अस्त्रे (Guided Weapons) वापरण्यात येऊ लागली. त्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी जमिनीवरून मारा करणारी लांब पल्ल्याची, मध्यम पल्ल्याची आणि आखूड पल्ल्याची मार्गदर्शक अस्त्रे अस्तित्वात आली. तसेच नौदलाच्या जहाजांवरसुद्धा अशी क्षेपणास्त्रे बसविली गेली. ७०च्या दशकात नौदल, वायुदल आणि भूदल यांची हवाई हल्ल्याविरोधात एक सर्व समन्वयक प्रणाली अस्तित्वात आली. त्यात लांब पल्ल्याची रडार यंत्रणा, तसेच अस्त्र आणि तोफा यांच्या नियंत्रणाची कार्यप्रणाली यांचा समावेश होता. शत्रूच्या विमानांचा ठाव घेणारी आणि जमिनीवरील शस्त्रास्त्रांना वेळीच सावध करणारी आणि त्यांना दिशा दर्शविणारी विमाने अस्तित्वात आली (AWAC विमाने) आणि त्यांच्या साहाय्याने जमिनीवरून आकाशात मारा करणे सुकर होऊ लागले.

**हवाई हल्याविरोधातील तोफखान्याचे महत्त्व आणि कार्यप्रणाली :** एकविसाव्या शतकात हवाई हल्ल्यासाठी जसा अद्ययावत विमानांचा वापर होत आहे, तसाच जमिनीवरून मारा करणाऱ्या दूर पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचाही धोका वाढला आहे आणि विमानविरोधी तोफखान्यात 'क्षेपणास्त्रविरोधी क्षेपणास्त्रे' अंतर्भूत करण्यात आली आहेत. स्वतःच्या सैन्याला, शहरांना, महत्त्वाच्या ठिकाणांना, आरमाराला आणि विमानतळांना संरक्षण पुरविण्याची गरज वाढली आहे. म्हणूनच सैन्याचा हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. शत्रूच्या हवाई हल्ल्याची पूर्वसूचना देणे, वेगवेगळ्या शास्त्रास्त्रांना दिशा देणे, अचूक मारा करणे आणि भूदल, वायुदल आणि नौदल यांच्यात समन्वय साधणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे सर्व कमीतकमी वेळांत साध्य करणारी यंत्रणा अस्तित्वात आली आहे. शत्रूचा हल्ला आपल्या महत्त्वाच्या ठिकाणांवर येण्यास मज्जाव करणे, हे या यंत्रणेचे मुख्य काम आहे.

# घार





सामान्य घार (*मिल्व्हस मायग्रान्स*) : (१) घरट्यातील पिलासह मादी, (२) अंडी.



पक्षी वर्गाच्या फॅल्कोनिफॉर्मीस (Falconiformes) गणातील असिपिट्रिडी (Accipitridae) कुलाच्या मिल्व्हिनी (Milvinae) उपकुलातील एक शिकारी पक्षी. याला सामान्य घार, साधी घार किंवा नागरी घार असेही म्हणतात. घारीच्या जगभरात २२ जाती आढळतात. त्यांपैकी ८ जाती इलॅनिनी (Elaninae) व १४ जाती मिल्व्हिनी या उपकुलातील आहेत. सामान्य घारीचे शास्त्रीय नाव मिल्व्हस मायग्रान्स (Milvus migrans) असे आहे. असिपिट्रिडी कुलातील हा सर्वाधिक संख्येने आढळणारा पक्षी आहे. घार समशीतोष्ण व युरेशियाच्या उष्णकटिबंधीय भागात मोठ्या प्रमाणात आढळते. तिची युरोपमध्ये संख्या कमी, तर दक्षिण आफ्रिकेमध्ये अधिक आहे. भारतात घार सर्वत्र आढळते. ती हिमालयात सु. २,४४० मी. उंचीपर्यंत आढळते. तसेच नेपाळ, बांगला देश, पाकिस्तान, श्रीलंका आणि म्यानमार या देशांतही ती आढळते. तिच्या काही जाती युरोप, आशिया, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया येथे सापडतात. सामान्य घारीच्या पुढील उपजाती आहेत – (१) यूरोपियन काळी घार (मि. मा. मायग्रान्स; M. m. migrans), (२) काळ्या कानाची घार (मि. मा. लिनिएटस; M. m. lineatus), (३) तैवान घार (मि. मा. फॉर्मोसॅनस; M. m. formosanus), (४) छोटी भारतीय घार (मि. मा. गोविंदा; M. m. govinda), (५) दुभंगलेल्या शेपटीची घार (मि. मा. अफिनिस; M. m. affinis), (६) पिवळ्या चोचीची घार (मि. मा. एजिप्टिअस; M. m. aegyptius)

सामान्य घार आकाराने गिधाडापेक्षा लहान साधारणपणे ५०–६० सेंमी. लांबीची असून वजन सु. ७०० ग्रॅ. असते. तिचा रंग गडद तपकिरी असतो. डोके चपटे; चोच काळी, टोकदार, आखूड व बाकदार असते. चोचीच्या बुडाकडील भाग पिवळसर रंगाचा असतो. डोळे लालसर तपकिरी किंवा पिवळसर रंगाचे असतात. पायाचा रंग पिवळा असून नखे तीक्ष्ण व काळी असतात. घारीचे पंख लांब व टोकदार असून पंखविस्तार सु. १५० सेंमी. असतो. पंख काळ्या रंगाचे असून शरीराचा खालील भाग पिवळसर तपकिरी असतो. शेपूट लांबट व दुभंगलेली असते. दुभंगलेल्या शेपटीमुळे घारीस दिशा व वेग बदलता येतो. तसेच यामुळे ती आकाशात इतर पक्ष्यांपासून वेगळी ओळखता येते. घार एकटी किंवा चार-पाचच्या थव्यात भटकत असते. सामान्य घार नदीकाठी, शेतात, विरळ जंगलात अधिवास करते. ती मानवाच्या सहवासात राहणारी असून खाटिकखाने, मासळीबाजार, मांसबाजार, कचऱ्यांचे साठे, गोदी आणि बंदरे यांच्या आसपास मिळणारे अन्न गोळा करताना बहुसंख्येने दिसते. घार मांसाहारी असून बेडूक, उंदीर, मासे, सरडे, पक्ष्यांची पिले हे तिचे खाद्य आहे.

# महावेली गंगा नदी



श्रीलंकेतील सर्वाधिक लांबीची नदी. तिला सिंहली भाषेत 'ग्रेट सँडी रिव्हर' या नावाने ओळखले जाते. या नदीची लांबी ३३५ किमी. आणि जलवाहन क्षेत्र १०,४४८ चौ. किमी. आहे. ही नदी देशाच्या मध्य आणि पूर्व भागांतून वाहते. तिचा उगम श्रीलंका बेटाच्या दक्षिणमध्य भागातील उच्चभूमी प्रदेशातील हॅटन पठारावर होतो. उगमानंतर प्रथम चहा आणि रबर उत्पादक प्रदेशातून उत्तरेस व ईशान्येस वाहत जाऊन कँडी शहराजवळ ती पूर्ववाहिनी बनते आणि त्यानंतर ती सखल प्रदेशांतून पुन्हा उत्तरेस वाहू लागते. या भागात तिला आंबन गंगा ही तिची प्रमुख उपनदी येऊन मिळते. हॅटन ओया व कोटमाली ओया या तिच्या इतर प्रमुख उपनद्या आहेत. पोलोन्नरुव या ठिकाणापासून पुढे वाहत गेल्यानंतर शेवटी ती त्रिंकोमाली बंदराच्या दक्षिणेस ११ किमी. वर कोड्डियार उपसागरमार्गे बंगालच्या उपसागराला मिळते.

महावेली गंगा नदीचे शीर्षप्रवाह श्रीलंकेच्या आर्द्र प्रदेशातून वाहत असल्यामुळे ती बारमाही वाहते. त्याचा फायदा देशाच्या पूर्व भागातील शुष्क प्रदेशातील शेतीसाठी चांगला होतो.

# पाणथळ जागा : रामसर क्षेत्रे



पाणथळीच्या जागा ह्या नैसर्गिक जलचक्राचे महत्त्वाचे भाग आहेत. जमीन आणि पाणी यांचा समन्वय साधणाऱ्या अशा जागा गोड्या वा खारट पाण्याखाली आणि अनेक प्रकारच्या आकारांत असतात. उदा., नद्या, नाले, तलाव, खाजण तलाव, खारपर्णी वने, शेवाळी दलदल, प्रवाळ, खडक-वने, तसेच मानवनिर्मित तलाव, शिवारे, कालवे व कालव्याखालील शेती, मिठागरे, धरणे, इत्यादी. अशा जागांमध्ये प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही प्रकारांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. शिवाय तेथे जैवविविधताही प्रचंड प्रमाणात असते. एकपेशीय वनस्पती व प्राणी, अनेक प्रकारची लव्हाळी, मुळा-खोडात ऑक्सिजन साठविण्याकरिता पोकळ्या असणाऱ्या विविध वनस्पती आणि त्यांच्या आश्रयाने जगणारे अनेक प्रकारचे प्राणी यांनी पाणथळ जागा समृद्ध असतात. पाण्याखाली वाढणारी एलोडिया-सेराटोफायलम, पाण्यावर तरंगणारी लेम्ना-वूल्फिया-आयकोर्निया, चिखलात रोवून पाण्याबाहेर डोकावणारी रामबाण,रीड, खाऱ्या चिखल-पाण्यात वाढणाऱ्या तिवर-सुंदरी इ. खारपर्णींचे अनेक प्रकार यांचा दलदलीच्या प्रदेशात निवास असतो. नागरीकरण आणि औद्योगिकीकरण यांच्या रेट्यामुळे,पाण्याचा बेसुमार उपसा केल्याने आणि घनकचऱ्याची भर टाकण्यामुळे पाणथळ जागा आक्रसून जात आहेत.याचा अनिष्ट परिणाम जैविक उत्पादकता आणि वैविध्य यांवर होत असतो. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी पाणथळ क्षेत्रांचे जतन व संवर्धन होणे जरूरीचे आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादनक्षमता व जैवविविधता असलेली पाणथळ क्षेत्रे संरक्षित ठेवण्यासाठी इराणमधील रामसर या शहरात दि. २ फेब्रुवारी १९७१ रोजी आंतरराष्ट्रीय अधिवेशनात ठराव केला गेला, त्यास रामसर ठराव ( करार) म्हणतात. भारताने हा ठराव सन २०१० मध्ये मान्य केला आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने अधिकृत रामसर क्षेत्रांना संरक्षण देणे बंधनकारक आहे आणि त्याप्रमाणे नियमावलीही तयार करण्यात आली आहे. विसाव्या शतकाच्या शेवटी केलेल्या अंदाजाप्रमाणे भारतात सुमारे ५८.२ दशलक्ष हेक्टर क्षेत्र पाणथळीखाली असून सन २०१० पर्यंत पुढील २६ क्षेत्रे रामसर क्षेत्रे म्हणून नोंदविली आहेत : अश्टामुडी पाणथळ (२००२, केरळ), भितरकर्णिका वन्यजीव (२००२, ओडिशा), भोज पाणथळ (२००२, मध्य प्रदेश), चिल्का सरोवर (१९८१, ओडिशा), डिपोर बील (२००२, असम), पूर्व कोलकाता पाणथळ (२००२, पश्चिम बंगाल), हरिके सरोवर (१९९०, पंजाब), कांजली (२००२, पंजाब), केवलादेव राष्ट्रीय उद्यान (१९८१, राजस्थान), कोलेरू सरोवर (२००२, आंध्र प्रदेश), लोक्तक सरोवर (१९९०, मणिपूर), पॉइंट कालीमीर वन्यप्राणी आणि पक्षी अभयारण्य (२००२, तामिळनाडू),

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## थोडक्यात



### विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची पत्रकार परिषद

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** भुमरेंचा ड्रायवर जर मुद्रांक शुल्क ३७,३८ कोटी आणू शकेल, तर भुमरे किती आणू शकतील असा माझा प्रश्न आहे.सरकारच्या कोणत्याही चौकशीत दम नाही, अशी टिका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत केली.

यावेळी ते म्हणाले की, न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करण्याचे काम महानगरपालिकेने केले आहे. पोलिसांवर हात उचलणे, दंगा करणे, मनपाचे लावलेले ताडपत्री फाडणे, हीच गोष्ट मराठी बांधवाने आणि मुसलमानाने केले असते तर आगडोंब केला असता. स्वतःच्या घराला जाळी लावतात आणि कबुतरांना न्याय मिळायला पाहिजे असे बोलतात.एखाद्या मुस्लिम व्यक्तीने असा चाकू काढला तर पोलिसांनी दांडा दिला असता.कायदा सर्वांना सामान असतो. भुमरे यांनी गिफ्ट दिले तरी त्याला कर लागतो. मुद्रांक शुल्क ३७,३८ कोटी रुपये आहे. भुमरेंचा ड्रायवर जर मुद्रांक शुल्क ३७,३८ कोटी आणू शकेल, तर भुमरे किती आणू शकतील असा माझा प्रश्न आहे. तू मारल्यासारखे कर, मी लागल्यासारखे करतो असा प्रकार सुरू आहे. शिंदेंची यांना गरज आहे. गिफ्ट वैगरे रद्द केले पाहिजे. भुमरे यांच्या मुलाचे सीडीआर काढले पाहिजे. मासेमारी बंद झालेली असते, ती आज सुरू झालेली होते.कोळी बांधव यांच्यासोबत आदित्य ठाकरे जातात. एकनाथ शिंदे नाटक करण्यासाठी गेले असतील.अशी टिका विरोध पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत केली.



### पुण्यात नवीन महानगरपालिका होण्याची संकेत मंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**पुणे :** लोकसंख्या आणि नागरिकीकरण वाढल, त्यामुळे वाहतूक आणि पायाभूत सुविधा प्रश्न निर्माण होत आहेत.त्यामुळे पुण्यात नवीन महापालिका होण्याची संकेत आहेत. अशी माहिती मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की,आपल्या सण, परंपरा आणि संस्कृती यात तुम्ही कोण आहात याला अर्थ नसतो. राखी किंवा सण साजरा परंपरेने साजरा करतो. एलपीजी गॅस अनुदान आणि उज्वला गॅस योजनेत साडे दहा कोटीचा फायदा महिलांना होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून महिलांना हे रक्षाबंधनाचे गिफ्ट आहे.महिला आणि बहिणींसाठी सगळ्या हिताचा विचार नरेंद्र मोदी करतात.लाडकी बहीण योजना पूर्णत्वाकडे जाताना दिसत आहे. पीएम,पीसीएमसी,पीएमआरडीए लोकसंख्या आणि नागरिकीकरण वाढल, त्यामुळे वाहतूक आणि पायाभूत सुविधा प्रश्न निर्माण होत आहेत.त्यामुळे पुण्यात नवीन महापालिका होण्याची संकेत आहेत. गणेशोत्सवाला १३० वर्षापेक्षा जास्त इतिहास आहे. त्यात सगळे एकत्र बसून मार्ग काढू.अशी माहिती मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### मुंबई नंतर पुण्यातही कबूतर खाद्यबंदीचा वाद उच्च न्यायालयात

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**पुणे :** पुण्यातील कबुतराचा खाद्यबंदीचा वाद आता थेट उच्च न्यायालयात गेला आहे. महानगरपालिकेने शहरातील २० ठिकाणी कबुतरांना सार्वजनिक खाद्य टाकण्यास बंदी आणली आहे. तर,आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांना ५०० रुपयाचा दंड केला जातो आहे.मात्र आता पुण्यातील शाश्वत फाउंडेशनने या बंदीला विरोध करणारी याचिका दाखल उच्च न्यायलयात केली आहे. महानगरपालिकेने २०२३ ला कबुतरांना उघड्यावरती खाद्य घालण्यास बंदी घातली होती. मात्र, कबुतरांचा हक्क हिरावून घेतला जातो आहे, असं फाउंडेशनच म्हणणं आहे. त्यासाठी त्यांनी पुणे महानगरपालिका निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.अशी माहिती मुंबई हायकोर्टचे वकील हर्षल गौड यांनी दिली.



### मुलाच्या सायकलचा धक्का लागून मांजर गावात मारहाण

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**जालना :** काल 8 ऑगस्ट 2025 शुक्रवार रोजी रात्री 9 वाजेच्या सुमारास लहान मुलांच्या सायकलचा धक्का लागून, दोन शेजाऱ्यांची मारहाण झाली होती. मात्र सदर घटनेची माहिती ही सोशल मीडियावर अफवा पसरवत केली जात आहे की, एका धार्मिक स्थळावरून प्रार्थना करून आल्यावर त्या प्रार्थना करणाऱ्या नागरिकांवर हल्ला करण्यात आला आहे. हे सरासरी चुकीचा असून, यामध्ये पोलीस चौकशी करत आहेत. व काही नागरिकांच्या दुचाकी सुद्धा पोलिसांनी जप्त केले आहेत. व सध्या गावात शांतता असून, कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये. व सोशल मीडियाचा वापर जरा जपून करावा. असा इशारा याप्रसंगी बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एन.टि. सुरवसे यांनी दिला आहे .

# राहुल गांधी मतदारांचा वारंवार अपमान करत आहेत : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आरोप

**दै. आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राहुल गांधी मतदारांचा वारंवार अपमान करत आहेत.जेव्हा या महाराष्ट्रामध्ये लोकसभेत त्यांना अडीच कोटी मते मिळाले तेव्हा ते कधीही बोलले नाही. लोकसभेत मिळाले तेव्हा बोलले नाहीत. प्रत्येक वेळी मतदारांच्या वेळी मतदार यादीमध्ये ऑब्जेक्शन घेण्याची वेळ असते.तेव्हा प्रत्येक बुथवर सर्वच पक्षाचे एकेक एजंट बूथ असतात. त्यांनी ऑब्जेक्शन घ्यायचे असतात.. तुम्ही ऑब्जेक्शन घेतलं नाही. मतदार याद्यांवर ऑब्जेक्शन घेतलं नाही.. मशीन सील करताना ऑब्जेक्शन घेतलं नाही. आता मात्र मतदारांचा अपमान करताहेत.अशी टिका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना केली. देवा भाऊ लाडकी बहीण को-ऑपरेटिव्ह पतसंस्थेचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, बँकेच्या माध्यमातून देवा महिलांना सक्षमीकरण करण्याचे अभियान सुरु केले. एक अभिनंदनीय अभियान आहे. देवभाऊ चे सरकार महिलांना सक्षमीकरण करण्या साठी मोठे पाऊल उचलते आहे. 26 लाख लाडक्या बहिणीचे अपात्रतेची चौकशी करण्यात येत आहे. योजना लाडक्या बहिणी करता तयार केली. त्याच लाभार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यायचा असतो..चुकीचे लोक योजनेत घुसले.. कुठलीही योजना असो.. कमी करायला लागतील.लाडक्या बहिणीसाठी देवा भाऊंनी सुरू केली.. त्यामध्ये जर माणसे आले असतील मोठ्या प्रमाणात चुकीचे लोक आले असतील तर ते कमी केले गेल्या पाहिजे.. जाणीपूर्वक कोणाला कमी करणार नाही. राहुल गांधी मतांचा घोटाळा झाला असल्याचा आरोप करीत आहेत. राहुल गांधी मतदारांचा वारंवार अपमान करत आहे.जेव्हा महाराष्ट्रामध्ये लोकसभेत त्यांना अडीच कोटी मते मिळाले तेव्हा ते कधीही बोलले नाही.. लोकसभेत बोलले नाहीत. प्रत्येक वेळी मतदारांच्या वेळी मतदार यादी मध्ये ऑब्जेक्शन घेण्याची वेळ असते. तेव्हा प्रत्येक बुथवर सर्वच पक्षाचे एकेक एजंट बूत असतात. त्यांनी ऑब्जेक्शन घ्यायचे असतात.. तुम्ही ऑब्जेक्शन घेतलं नाही. मतदार याद्यांवर ऑब्जेक्शन घेतलं नाही.. मशीन सील करताना ऑब्जेक्शन घेतलं नाही.आता मात्र मतदारांचा अपमान करतायेत तुम्ही निवडणूक हरल्यामुळे. माझे त्यांना आवाहन आहे.अजून एक निवडणूक आहे. नगरपालिका महानगरपालिका बोगस मतदारामुळे निवडणूक हरलो ते म्हणतील.बोगस मतदान झालं..मतदान याद्या चुकीचे आहेत.महाराष्ट्रामध्ये महायुती ५१ टक्के मते घेऊन जिंकणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था नगरपालिका महानगरपालिका जिल्हा परिषद आम्ही जिंकणार आहोत.सर्व निवडणुका महायुती जिंकणार. राहुल गांधींनी हे म्हणून की मतदार यादी बोगस होती. आत्ताच मतदार या चेक करून घ्या. राहुल गांधी महाराष्ट्रात देशात सर्वच निवडणुका हरणार. राहुल गांधींना देशाचं कुठलंही व्हिजन नसल्यामुळे विकासाची नाडी कळली नाही म्हणून.काँग्रेस पार्टी लोक सोडून चाललेत.. काँग्रेस पार्टी शून्य झाल्याशिवाय राहणार नाही. शरद पवार गौप्यस्फोट २८८ जागांपैकी 160 जागा जिंकण्याची हमी घेऊन दोघेजण आले होते. तेव्हाच का नाही बोलले शरद पवार. जे आज बोलतायेत शरद पवार, ज्या दिवशी हे तुमच्याकडे आले त्या दिवशीच पोलीस कम्प्लेंट का नाही केली.. तुम्ही त्या दिवशी पोलिसात का नाही टाकले. शरद पवार यांनी असे बालिशपणाचे स्टेटमेंट करावं शरद पवार साहेबांना निश्चितपणे शोभणार नाहीये.. तुम्ही निवडणूक आयोग किंवा पोलिसात कंप्लेंट का केली नाही.. तुम्ही निवडणूक हरल्यावर तुमच्या पार्ट्यात कोणी राहायला तयार नाही. तुमचं पूर्ण नेतृत्व उध्वस्त होत आहे.. म्हणून असे बालिशपणाचे स्टेटमेंट करणे चालू आहे. मग राहुल गांधी यात पडले का नाही. पोलिस केस का केली नाहीत. सीबीआयमध्ये तक्रार का केली नाही. देशामध्ये यंत्रणा आहेत. यंत्रणांकडे तक्रार का केली नाही. निवडणूक आयोगाकडे तक्रार का केली नाही. जेव्हा तुम्ही



लोकसभेमध्ये खोटारडेपणा केला लोकांनी ऐकला.. आता पुन्हा खोटारडेपणा करता येत कारण बिहार निवडणूक हरणार आहेत.. महाराष्ट्र पूर्ण हातातून जाणार आहे. लोक सोडून चालले आहेत.. नेते काही शिल्लक राहिलेले नाहीत.. त्यामुळे भारतीय जनता पार्टी ५१ टक्के मते घेऊन जिंकणार आहेत.. महाराष्ट्रात चुकीचा नरेटिव्हे तयार करण्याकरिता अशा प्रकारचे स्टेटमेंट करत आहेत. बोगस मतदाना संदर्भात मतदान आधार लिंक याबाबत प्रकाश आंबेडकर यांनाच विचारा मला माहित नाहीत.असे मतही यावेळी त्यांनी व्यक्त केले.हा पर्याय पुढच्या काळात निवडणूक आयोग करणारच आहे. निवडणूक आयोग पुढच्या काळात सुधारणा करत असतात. तो निवडणूक आयोगाचा प्रश्न आहे. निवडणूक आयोगावर उत्तर निवडणूक आयोगाने द्यायला हवे,पण भाजपच उत्तर देत आहे. अशी टिका विरोधकाकडून होत आहे.निवडणूक आयोगाचे उत्तर जर मी देत असलो तर त्यांचा वकील मी आहे.५० वेळा निवडणूक आयोगाने त्यांना उत्तर दिले. खोटं बोल पण रेटून बोल.. हे त्यांनी स्वीकारलेलं आहे.असे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.





### दामिनी पथकातील महिला कर्मचाऱ्यांसोबत अंबादास दानवे यांचा राखी पौर्णिमा सण साजरा

**दै. आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर दामिनी पथकातील महिला कर्मचारी व अधिकारी यांच्यासमवेत आज राखी पौर्णिमाचा सण साजरा केला. महिला अधिकारी यांनी दानवे यांना राखी बांधून रक्षाबंधन सणाच्या शुभेच्छा दिल्या. प्रातिनिधिक स्वरूपात पाच महिला अधिकारी यांनी अंबादास दानवे यांना राखी बांधली. राखी पौर्णिमा सणाला बहिणीने औक्षण केल्यानंतर सणाच्या परंपरेनुसार भाऊ बहिणीला भेट वस्तू देतो. त्याचप्रमाणे दानवे यांनी औक्षण केल्यानंतर महिला कर्मचारी यांना भेट वस्तू दिल्या. आनंदाच्या आणि उत्साहाच्या वातावरणात हा सण साजराझाला.

## सराईत गुन्हेगार टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई

**दै. आपला विदर्भ**

उमरखेड/प्रतिनिधी : पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील सराईत गुन्हेगार टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अंतर्ग कारवाई करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार उमरखेड पोलीस स्टेशन येथे ९ जून २०२५ रोजी शेख खालीद शेख अकबर, वय ३५, व्यवसाय-वेल्डींग वर्क शॉप रा. अब्दुल रहेमान कॉलनी उमरखेड जि. यवतमाळ यांनी तक्रार दिली की, ८ जून २०२५ रोजी सायंकाळी ताजपुरा वार्डात दोनगटामध्ये भांडण झाले होते. त्यानंतर दोन्ही गटाचे परत ९ जून २०२५ राजी दरम्यान आठवडी बाजार येथे समोरा समोर येउन भांडण झाले. त्या भांडणामध्ये शेख मुदस्सीर शेख जमील, शेख सोहेल शेख जमील रा. ताजपुरा वार्ड उमरखेड, शेख उबेद शेख निसार रा. ताजपुरा वार्ड उमरखेड, व इत्तर सोवतच्या तीन ते चार लोकांनी मिळुन फिर्यादी नामे शेख खलीद शेख अकबर याचा भाउ शेख अजहर शेख अकबर याच्यावर जीवाने मारुन टाकण्याच्या उद्देशाने चाकु तलवार रॉडने वार करुन त्याला गंभीर जखमी करुन त्याचा खून केला व तेथून पळून गेले.अशा फिर्यादीवरून आरोपी शेख मुदस्सीर शेख जमील, शेख सोहेल शेख जमील, शेख उबेद शेख निसार, शेख आरीश शेख खतीब व इत्तर सोबतच्या तीनते चार आरोपी यांच्यावर कायदेशीर



कार्यावाही होणे साठी पोलीस स्टेशन ला येउन तक्रार दिल्याने पो.स्टे.ला अप.क्र. ४२८/२०२५, कलम ०३(१), १८९(२)१८९ (४), १९९ (२),१९१ (३), १९० भारतीय न्याय संहिता २०२३. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे सदर गुन्ह्यामध्ये हे टोळीव्दारे कृत्य केलेले असल्याचे लक्षात आल्याने त्यांच्या आदेशानुसार यांच्यावर प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही करावी असे आदेशीत केले.त्यामुळे उमरखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी गेल्या १० वर्षामध्ये उमरखेड शहरात घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता शेख मुदस्सीर शेख जमील याचे टोळीकडून दहशतीच्या मार्गाचा अवलंब करुन वारंवार संघर्ष होवुन गंभिर गुन्हे घडल्याचे दिसुन आल्याने व टोळीव्दारे संघटीत गुन्हेगारी करुन उमरखेड शहरात आपले वर्चस्व प्रस्थापीत करण्यासाठी व इतर फायद्यासाठी वेळोवेळी सर्वसामान्य जनतेमध्ये दहशतीच्या माध्यमातुन भितीचे वातावरण तयार केले होते.

तसेच सदर गुन्ह्याच्या तपासात एकूण १२ आरोपी निष्पन्न झाले आहेत. नमुद गुन्हयातील प्रमुख सुत्रधार आरोपी टोळी प्रमुख शेख मुदस्सीर शेख जमील, वय २६, रा. ताजपुरा वार्ड उमरखेड व त्याचे साथीदार शेख जुनेद शेख निसार, वय २४ रा. ताजपुरा वार्ड उमरखेड, मोहम्मद सुहेल उर्फ शेख सोहेल शेख जमील वय २२ रा. ताजपुरा वार्ड उमरखेड, अस्लम खान छोटु खान वय २० रा. आंबेडकर वार्ड उमरखेड, शेख शोएब उर्फ उवेद शेख नीसार वय २० वर्षे, रा. ताजपुरा वार्ड उमरखेड, शेख अन्सार शेख मुस्ताक वय २२ रा. ताजपुरा वार्ड उमरखेड, मजहर काझी अल्लाऊद्दीन काझी खतीव, वय २५ रा. ताजपुरा वार्ड उमरखेड इतर पाच आरोपीविरुध्द उपरोक्त खून, खूनाचा प्रयत्न, गैरकायद्याची मंडळी जमवुन प्रणघातक हत्यारानिशी सज्ज होउन दंगाकरणे, कट रचुन चिथावणीखोर प्रक्षोभक करणे, गंभीर दुखापत करणे, धार्मिक भावना दुखावने, अल्पवयीन मुलीचा अपहरण करुन तिच्यावर लैंगीक आत्याचार करणे, लोकसेवकास त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासुन हमला, बलप्रयोग करणे, संपतीचा नुकसान करणे, लोकसेवकाने जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा करणे, शस्त्र वाळगणे यासारखे अनेक गुन्हे केलेले असल्याने उमरखेड पोलीस स्टेशनच्या वतीने महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम-१९९९ चे संघटीत गुन्हेगारी कलम समाविष्ठ करणे करीता विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. सदर गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम-१९९९ अंतर्गत कलम समाविष्ठ करण्याबाबत परवाणगी मिळाली आहे.सदर कारवाई यवतमाळ पोलीस अधीक्षक कुमार चिता,अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे, ठाणेदार शंकर पांचाळ, धनराज हाके, राहुल गोरे, आशिष चौधरी, सागर इंगळे यांच्यासह डी.थी. पथकाचे विजय पतंगे, दत्ता पवार, निवृत्ती महानळ, अकुंश दरबस्तेवार यांनी केली.

# वाळू माफियांविरोधात महसूल मंत्री ॲक्शन मोडवर !

**जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर एमपीडीए कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा, महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश, मंत्री, खासदार, आमदारांच्या सुचनांनुसार वाळू माफियांना सोडू नका, वाळू तस्करीत सामील अधिकाऱ्यांवरही निगराणी ठेवा, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांनी कडक कारवाई करावी, वाळू साठे व घाटांचे पुन्हा सर्व्हे करा**

**दै. आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील वाळू माफियांविरोधात महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे ॲक्शन मोडवर आले आहेत. जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर एमपीडीए अर्थात महाराष्ट्र धोकादायक व्यक्ती प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना शनिवारी महसूल विभागाच्या आढावा बैठकीत दिले.

महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी, भूमि अभिलेख विभागाचा आढावा घेण्यासाठी महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे काल जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यानुषंगाने त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात महसूल व इतर विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी मंत्री ना. बावनकुळे यांनी निर्देश दिले. या बैठकीला कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार श्वेता महाले, आमदार संजय गायकवाड, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपवनसंरक्षक सरोज गवस, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार उपस्थित होते. याबैठकीत महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणारे आणि त्यात सामील असणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निगराणी ठेवून दोषींवर कारवाई करावी. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करतांना मंत्री, खासदार, आमदारांच्या सूचना आल्यास त्यानुसार कार्यवाही करु नका आणि वाळू माफियांना सोडू नका, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. जिल्ह्यात यापुढे अवैध वाळू उत्खनन व

### ई-चावडी, जिवंत सातबारा मोहिमेचे कौतूक

- जिल्हा महसूल प्रशासनामार्फत राबविण्यात येणा-या ई-चावडी, जिवंत सातबारा मोहिमेची अंमलबजावणी समाधानकारक असून या मोहिमेचा टप्पा दोन लवकर पूर्ण करा, असे निर्देश देवून महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोहिमेचे कौतूक केले. या बैठकीत महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.




वाहतुकीला जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांवर जबाबदारी निश्चित केली जाईल,असा इशाराही महसूल मंत्र्यांनी यावेळी दिला. याशिवाय, जिल्ह्यातील वाळू साठे आणि वाळू घाटांचे पुन्हा सर्व्हेक्षण करावे. त्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांनी पाहणी करावी व एमआरसॅक यंत्रणेचा वापर करावा. तसेच नवीन वाळू धोरणानुसार कार्यवाही करावी. यासह, कृत्रिम वाळू धोरणांतर्गत वाळूचा उच्च दर्जा असावा याची खबरदारी घ्यावी. घरकुलांसाठी गरीब, सर्वसामान्यांना वाळू उपलब्ध करुन द्यावी. अवैध वाळू वाहतुकदारांकडील प्रलंबित दंड वसूल करावे. गायरान जमिनीवरील घरांची प्रकरणे निकाली काढा, त्यासाठी व्यापक मोहीम राबवावी. गैरकायदेशीररित्या शासकीय जमिनी बळकावणाऱ्या धनदांडग्यांवर कारवाई करावी. पाणंद व शिवररस्ते मोकळे करावे. त्यानुषंगाने गावनिहाय नकाशे तयार करुन दर्शनी भागात लावावे. नागरिकांच्या तक्रारी व प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करावे. विशेष सहाय योजना आणि ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणीसाठी गावपातळीवर मोहीम राबवा. यासाठी प्रशासनाने शेतकऱ्यांच्या घरोघरी भेटी द्याव्यात. पोटखराब, कजाप, सातबारा दुरुस्तीची कामे लवकरात लवकर पूर्ण करावी. शासनाच्या धोरणानुसार डिसेंबर महिन्यापर्यंत भोगवटादार वर्ग २ च्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरित कराव्यात. याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करावे.

# देवाभाऊ लाडकी बहीण महिला नागरी सहकारी पतसंस्थाचे महसूलमंत्री यांच्या हस्ते उदघाटन







## महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी पतसंस्थांची गरज- ना. चंद्रशेखर बावनकुळे

● दै. आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** चिखली तालुक्यातील देवाभाऊ लाडकी बहीण महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित पतसंस्थेचे उद्घाटन आज राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कामगार मंत्री आकाश फुंडकर उपस्थित होते.

उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष तथा आमदार श्वेता महाले, आमदार संजय गायकवाड, माजी आमदार विजयराव शिंदे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, माजी आमदार तोताराम कायदें, तसेच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसिलदार संतोष काकडे आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर ना. बावनकुळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. महिलांना आर्थिक सबलीकरणासाठी अशा संस्थांची गरज अधोरेखित केली. महिलांना आर्थिक व्यवहारात सक्षम बनविण्यासाठी पतसंस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. देवाभाऊ लाडकी बहिण पतसंस्थामुळे स्वयंरोजगार व बचत संस्कृती बळकट करण्यास मदत करेल, असा विश्वास व्यक्त केला. या पतसंस्थेच्या राज्यभर शाखा उभारून लाडक्या बहिणींना आर्थिकदृष्ट्या साक्षर व सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, शासन गोरगरीब, शेतकरी व सामान्य नागरिकांसाठी काम करत आहे. लाडक्या बहिणींना दरमहा १,५०० रुपये दिले जात आहेत, शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जात आहे, लवकरच समितीचे सर्व्हेक्षण पूर्ण करून गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. स्वस्तात शेतजमीन मोजणी, विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे अल्पदरात उपलब्ध करणे, नकाशा योजनेद्वारे प्रॉपर्टी कार्ड, स्वामित्व योजना, पाणंद रस्ता, तुकडेबंदी कायदा रद्द करणे असे ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतले आहेत. चिखली तालुक्यातील जिवंत सातबारा मोहिम संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी असल्याने ती राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. कामगार मंत्री आकाश फुंडकर म्हणाले, चिखली तालुका हा पतसंस्थांचा माहेरघर आहे. देवाभाऊ लाडकी बहीण पतसंस्थेमुळे महिलांना बचत ठेवण्याचे हक्काचे ठिकाण मिळाले आहे. केवळ अल्पावधीत २,५०० बहिणींनी येथे खाते उघडून हे सिद्ध केले आहे. या पतसंस्थेमार्फत महिलांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होणार असून महिलांनी स्वयंरोजगारासाठी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. आ. श्वेता महाले यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या भावी योजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, देवाभाऊ लाडकी बहीण पतसंस्था ही महाराष्ट्रातील पहिली महिलांची नागरी पतसंस्था असून, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवा टप्पा ठरेल. या उपक्रमाचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना स्वावलंबी बनवणे आणि लोकसंख्येतील सुमारे ४० टक्के हिस्सा असलेल्या महिलांना उद्योग, व्यवसाय व आर्थिक व्यवहारात प्रोत्साहन देणे हा आहे. उद्घाटन सोहळ्यासाठी स्थानिक मान्यवर, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, तसेच विविध महिला बचतगटांच्या प्रतिनिधीं, मोठ्या संख्येने नागरिक, महिला सदस्य आणि स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

## थोडक्यात




### मुंडे बंधू भगिनिंचे रक्षाबंधन साजरे

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**मुंबई :** माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज आपल्या बहिणींसोबत मुंबईतील पंकजा मुंडे यांच्या रामटेक शासकीय निवासस्थानी रक्षाबंधन साजरे केले. यावेळी धनंजय मुंडे त्यांना मंत्री पंकजा मुंडे आणि माजी खासदार प्रीतम मुंडे राखी बांधून औक्षण केले. मुंडे-बहीण भावांच्या रक्षाबंधन प्रसंगी महादेव जाणकार यांचीही उपस्थिती होती.





### फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन येथे रक्षाबंधन सण

### साजरा, निशांत सेवाभावी संस्था, सह सहेली जनविकास संस्था चा उपक्रम

**दै. आपला विदर्भ, प्रतिनिधी**

**अमरावती :** 9 ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणानिमित्त फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन येथे पोलीस अधिकारी कर्मचाऱ्या समवेत सामाजिक संस्थाच्या महिलांनी रक्षाबंधन सण साजरा केला. निशांत सेवाभावी संस्था अध्यक्ष पद्मा पुरी सोबतच सहेली जनविकास संस्था अध्यक्ष नंदा राऊत यांनी हा उपक्रम आयोजित केला.. संस्थेच्या पदाधिकारी सह महिला सदस्यांनी पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना ओवाळून राखी बांधून त्यांना रक्षाबंधन सणाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी क्यू आर टी पोलीस बांधवाना सुद्धा राखी बांधून रक्षाबंधन सणाच्या शुभेच्छा दिल्या.

## क्रांतीदिनाचे औचित्य साधुन ऑपरेशन सिंदुर मधील सैन्यांच्या शौर्याला सलाम

### शिवसेने तर्फे जम्मू काश्मिर येथे घेतले रक्तदान शिबिर; केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले शिबिराचे उद्घाटन





● दै. आपला विदर्भ

**बुलढाणा/ प्रतिनिधी :** ऑपरेशन सिंदुर अंतर्गत भारतीय सेनादलातील सैनिकांनी दाखविलेल्या शौर्याला सलाम करण्यासाठी शिवसेनेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सिंदुर महारक्तदान शिबिरात जमा होणारे रक्त हे जवानांच्या शौर्याचे प्रतिक राहणार असल्याचे मत केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले.

जम्मू काश्मिर येथिल AIIMS एम्स आर्मी कमांड हॉस्पीटल येथे सांगली जिल्हयातील शिवसेनेच्यावतीने भारतीय सेना दलातील शूर सैनिकांच्या सन्मानार्थ क्रांतीदिनाचे व रक्षाबंधनांचे औचित्य साधुन रक्तदान शिबिराचे आयोजन 9 ऑगस्टला करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, सांगली जिल्हयाचे शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.चंद्रहार पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी बोलतांना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, शिवसेनेच्या वतीने भारतीय सैनिकांना समर्पणात्मक पाठींबा दर्शविण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. भारतीय सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानाला सलाम, सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या महारक्तदान शिबिरामध्ये सांगली जिल्हयातील 1000 तरुण रक्तदान महायज्ञात सहभागी होणार आहे. त्यामुळे मी चंद्रहार पाटील व त्यांच्या टीमचे अभिनंदन करतो. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेनुसार 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण हा सेवाभाव घेउुन नेहमीच शिवसेनेच्या वतीने पीडीतांना मदत करण्याची भुमिका घेतली जाते शिवसैनिक निस्वार्थपणे प्रत्येकाला मदत करतो. हि शिवसेनेची समाजाप्रती असलेली बांधीलकी असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## बुलढाणा अर्बन बँकेकडून चोरी गेलेल्या सोन्याचा ग्राहकांना परतावा

### 19 ग्राहकांचे केले समाधान, 14 लाख 70 हजार वाटप

● दै. आपला विदर्भ
महेबुब शेख

**उमरखेड :** दिनांक 2 ऑगस्ट रोजी बुलढाणा अर्बन बँकेतून चोरीला गेलेल्या सोन्याचा बँकेने ग्राहकांना परतावा दिला आहे. यामुळे बँकेचे ग्राहक समाधानी झाले आहेत. बँकेच्या लिपिकाने 57 लाख रुपये किमतीचे 30 ग्राहकांचे सोने चोरून नेल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर बँकेचे विभागीय व्यवस्थापक अनिल वानखेडे यांनी सर्व ग्राहकांशी संपर्क साधला. त्यांनी ग्राहकांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि त्यांना दिलासा दिला. बँकेने चोरीला गेलेल्या वस्तूंचा योग्य मोबदला देऊन किंवा त्याच मापाच्या नवीन वस्तू देऊन ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण केले. या चोरीप्रकरणी बिटरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे काही ग्राहक बेचैन झाले होते, सध्या आज रोजी बँकेने ज्या ग्राहकांचे सोने चोरीला गेले त्या 5 ग्राहकांचे 14 लाख 70 हजार रुपये बँकेने तातडीने त्यांना दिले यवतमाळ विभागीय व्यवस्थापक श्रीमती मुग्धा देशपांडे व विभागीय व्यवस्थापक अनिल वानखेडे यांनी परिस्थिती गांभीर्य लक्षात घेता ग्राहकाचा हिताचा निर्णय घेऊन समस्येवर मात काढली. व काही ग्राहकांनी बँकेवर विश्वास असल्याची कबुली दिली ज्या 11 ग्राहकांचे सोने चोरीला गेले त्या ग्राहकांना बँकेने हमीपत्र लिहून दिले की, तुम्हाला पाहिजे त्यावेळी आम्ही तुम्हाला तुमच्या वस्तूचा, मोबदला देऊ असे सांगितले उपाययोजनांमुळे ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

बँकेच्या सुशोभीकरणा संदर्भात काही ग्राहकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले की बँकेमध्ये फॅन, कूलर, एसी नाही बँकेचे स्लॅब लिकेज आहे बँकेत सतत अंधार असतो असे वरिष्ठांना बँकेतली काही ग्राहकांनी तोंडी तक्रारी केल्यामुळे ढाणकी शाखेचे व्यवस्थापक जोशी यांनी काही ग्राहकांना खाते बंद करण्यास सांगितले, त्यामुळे काही ग्राहक त्यांच्यावर नाराज असल्याचेही बोलले जात आहे.



◆ **5.60 ग्राम माझे सोने चोरीला गेले असता बँकेने मला चालू भावानुसार 56650 रुपये देऊन माझे समाधान केले आहे त्यामुळे या बँकेवर माझा विश्वास आहे व कोणत्याही कागदाची मागणी न करता मला तात्काळ बँकेने पैसे दिले आहे**
**संतोष माधव राचटकर, ग्राहक**




### पुराच्या पाण्यात मोटरसायकलसह वाहून जात असलेल्या शिक्षकाचे दोन युवकांनी वाचवले प्राण

● दै. आपला विदर्भ

**सिंदखेड राजा/प्रतिनिधी :** तालुक्यात आज सकाळ पासूनच मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे परिसरातील नदी नाल्यांना मोठा पूर आलाय. अशातच सोनुशी नदीला आलेल्या पुरातून एक शिक्षक मोटरसायकलवर शाळेत जात असताना ते पुरात वाहून जात असताना काही तरुणांनी समयसूचकता दाखवत त्यांचा जीव वाचवला आहे.दोन्ही तरुणाचे कौतुक केले जात आहे.